# प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी कालखंडात अमुलाग्र बदल घडून आलेला दिसतो. हा बदल घडून येण्यामागे भारतीय संविधान कारणीभूत झालेले दिसते. भारतीय संविधानामध्ये उपेक्षित जाती-जमातींना शिक्षणाची समान संधी प्राप्त झाली. शिक्षणामुळे उपेक्षित जातीला आत्मभान आले. या आत्मभानातुनच उपेक्षित जातींना आपल्या वाट्याला आलेले दु:ख, दैन्य, दारिद्र्य, अवहेलना इ. ओळख होऊ लागली. या उपेक्षित सामाजिक समुहांनी आपल्या जाती-जमातीच्या वेदनांवर वाङ्मयनिर्मिती करण्यास प्रारंभ केला. ही साहित्यनिर्मिती 'दलित साहित्य' या नावाने संबोधली जाते. दलित साहित्य या संकल्पनेंतर्गत निर्मिती करणारे सामाजिक समूह सामाजिकदृष्टया उपेक्षित मानलेले समूह आहेत. त्या सामाजिक समुहांवर लादलेल्या निर्बंधामुळे अमानवी जीवन, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या आधीन राहणे भाग पडत होते. त्यामुळे या समाजाला सामुहिक जीवनात कोणतेही स्थान मिळत नव्हते. भारतीय संविधान अस्तित्वात आल्यानंतर तसेच, याच काळात या समाजाला आत्मभान येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या चळवळी केल्या, त्याचबरोबर जी वैचारिक मांडणी केली, त्यातून हे सर्व सामाजिक सनुह आपल्या हक्कासाठी संघर्ष करू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या सर्व समुहांना समान संधी प्राप्त करून देण्यासाठी शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचे प्रावदान केले. परिणामत: अनुसूचित जाती-समुहांवरती लादलेली अस्पृश्यता, अनुसूचित जमातींना मानवी संस्कृतीपासून दूर, दऱ्याखोऱ्यात, जंगलात जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, भटक्या जातींना करावी लागणारी सततची भटकंती हे परंपरेने चालत आलेले होते. तसेच विमुक्त जातींवरती गुन्हेगारीचा शिक्का मारून घातलेले सामाजिक निर्बंध हे पुढे परंपरेने चालत राहिले. मात्र या चार जाती समुहांपैकी विमुक्त जातींच्या समुहासाठी आधुनिक कालखंडामध्ये म्हणजेच इंग्रजी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

राजवटीत कायद्याने निर्बंध घालण्याची जाचक प्रथा रूढ केली. आधुनिक कालखंड सामाजिक समानतेचा पुरस्कार करत असताना दुसऱ्या सामाजिक समुहांवर निर्बंध घातला जातो, ही घटना अन्यायकारक होती. अशा सामाजिक समुहांवरचा एकूणच सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहार अभ्यासणे आवश्यक झाल्याने या सामाजिक समुहांचा अनेक मान्यवरांनी अभ्यास केलेला आहे. त्यापैकी आर.ई.इंथोवन (The tribes and casts of bombay presidency), केनेडी (criminal classes in the bombay presidency), रिस्ले (the people of india), त्रि.ना.अत्रे (गुन्हेगार जाती), अनिल अवचट (माणसं), प्रभाकर मांडे (गावगाड्याबाहेर ), रामनाथ चव्हाण (भटक्या विमुक्तांचे अंतरंग), बाळकृष्णा रेणके (भटक्या विमुक्तांचा एल्गार येत आहे), डॉ. लीनकुमार बावणे (भटक्यांचा भग्न संसार व संस्कृती), ना.धों.कदम (महाराष्ट्रातील भटका समाज: संस्कृती व साहित्य) अशा अनेक अभ्यासकांनी ग्रंथलेखन केलेले आहे. केनडी व त्रि. ना. अत्रे यांनी केलेल्या लेखनात विमुक्त जातींविषयी पूर्वग्रह दृष्टिकोन बाळगलेला दिसतो. इंथोवन यांनी केलेले लेखनात चिकित्सक वृत्तीचा अभाव दिसून येतो.

या सर्व अभ्यासकांच्या ग्रंथामध्ये विमुक्त जातीविषयी केलेले विवेचन यातून या जातीच्या एकूण समाजजीवनाचा सर्वांगीण आलेख अनुभवास येतो. त्यामध्ये प्रामुख्याने विमुक्त संकल्पना, विमुक्तांचे जीवन व्यवहार, त्यांच्या सामाजिक परंपरा, रिती-रिवाज, जात-पंचायत आणि संस्कृती आदींवरती प्रकाश पडतो. त्यापैकी प्रथमत: विमुक्त जाती संकल्पनेचा विचार करूया. विमुक्त जाती संकल्पनेच्या संदर्भात केलेल्या व्याख्यांमध्ये त्रि.ना.अत्रे, अनिल अवचट, बाळकृष्ण रेणके, लिनकुमार बावणे, रामनाथ चव्हाण, डॉ. ज्योतिप्रसाद जैन, मोतिराज राठोड, के.एन.कदम, राहुल सांकृत्यायन इ. अभ्यासकांच्या व्याख्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात विचार करूया.

१.रामनाथ चव्हाण:-

"इंग्रजी सत्ता भारतात स्थिरस्थावर झाल्यानंतर १८७१ साली 'क्रिमीनल ट्राईब्ज अक्ट' करण्यात आला. या कायद्यानुसार भटक्या लोकांचे समूहच्या समूह गुन्हेगार टोळया ठरविण्यात आले आणि बंदिस्त वस्त्यात त्यांना अडकवून ठेवण्यात आले. स्वतंत्र भारतात हा कायदा मागे घेण्यात आला. गुन्हेगार टोळ्या किंवा गुन्हेगार जमातींना 'विमुक्त जमाती' असे संबोधण्यात येऊ लागले."[१] रामनाथ चव्हाण यांच्या व्याख्येवरून असे लक्षात येते की, इंग्रजांनी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करून १८७१ च्या 'क्रिमीनल ट्राईब्ज ॲक्ट' नुसार मान्वी समुहाला जन्मजात गुन्हेगार ठरवून त्यांच्यावरती अनेक प्रकारचे अत्याचार, जाचक निर्बंध लादले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात हा कायदा भारत सरकारने मागे घेऊन या गुन्हेगार टोळ्यांना विमुक्त केले. त्या गुन्हेगार जमातींना 'विमुक्त' असे संबोधण्यात येऊ लागले.

२. त्रि.ना.अत्रे :-

"बहुश: सुगीच्या संधानात व तुरळक इतर दिवसात गावगन्ना ते बिछायती येतात त्यात काही वतनदार व काही उपलानी असतात. येथे वतनदार याचा अर्थ इतकाच की, हे फिरस्ते नियमीत काळी नियमीत रहाळातील गावी येतात व तेथे आपला माल विकून, काम करून अगर भिक्षा मागून कमाई करतात. अशाप्रकारे उघाडीच्या दिवसात हे अनेक गावे घेतात आणि पावसाळा ते स्थाईक झाले असतील त्या गावी किंवा आपले रहाळात कोठे तरी काढतात. जे फिरस्ते नेमलेल्या गावी वहिवाटीप्रमाणे न येता वाटेल तेथे भटकतात त्यांना आपन उपलानी म्हणू."[२] अत्रे यांनी आपल्या व्याख्येमध्ये विमुक्तांकरिता वतनदार व उपलानी असे शब्द वापरलेले आहेत. येथे त्यांच्या व्याख्येमध्ये विरोधाभास आढळतो. कारण एके ठिकाणी त्यांनी असे म्हटले आहे की, हे भटके लोक नियमीत काळी नियमीत

रहाळातील गावी येतात. म्हणजेच त्यांची गावे नेमलेली ठरलेली असतात. व त्या गावी ते सुगीच्या दिवसांमध्ये काम करून अगर भिक्षा मागून खातात. आणि एके ठिकाणी ते म्हणतात की, जे फिरस्ते नेमलेल्या गावी वहिवाटीप्रमाने न येता वाटेल तेथे भटकतात त्यांना आपन उपलानी म्हणू. त्यांच्या या विधानामध्ये तथ्य वाटत नाही. तसेच सुगीच्या दिवसांमध्ये इतरांच्या वळचणीला येणारे, काम करणारे, भिक्षा मागणारे लोक, आपला माल विकण्याइतपत स्वावलंबी कसे बनले? हा प्रश्न उभा राहतो. त्याचप्रमाने आत्रे यांनी या लोकांना आपन फिरस्ते, उपलानी किंवा विमुक्त म्हणू असे गृहीत धरावयास सांगितलेले आहे. त्यामूळे ही व्याख्या प्रमाण मानता येणार नाही.

३. अनिल अवचट :- "आदिम किंवा मेंढपाळ समूहांनी कालानुरूप बदलायचे नाकारले असावे, म्हणून ते वेगळे व मागास राहिले असावेत, त्यांना तशा स्थितीत ठेऊन त्यांचे शोषण उत्तम प्रकारे करता येईल. म्हणुन मुख्य समाजाने त्यांना पुढे धाकानेच वेगळे ठेवले किंवा काही जमाती इथल्या मूळ-रहिवासी असाव्यात आणि नंतर आलेल्या लोकांनी त्यांना तेथून हुसकावून लावून भटके बनवले असावे, किंवा या जमाती दुसरीकडून इथे आल्या व इथल्या समाजाने त्यांना समजावून न घेतल्याने त्या समाजाच्या परिघावर भटकत राहिल्या असाव्यात."[३] अवचट यांनी भटक्या जमातींच्या व्याख्येविषयी विविध भूमिका घेतलेल्या दिसतात. मात्र निश्चित अशा कोणत्यातरी एकाच भूमिकेवर ते ठाम नाहीत. एके ठिकाणी ते म्हणतात की, आदिम किंवा मेंढपाळ लोंकानी बदलत्या परिस्थितीनुसार बदलायचे नाकारले असावे त्यामुळे ते मागास राहिले असावे किंवा त्या आदिम लोकांना तशाच मागासलेल्या स्थितीत ठेवून मुख्य समाजाने त्यांच्यावर धाक दाखवला असावा किंवा या जमाती इथल्या मूळ रहिवासी असून मागाहून आलेल्या लोकांनी त्यांना भटके बनवले असावे किंवा या जमाती दुसरीकडून आल्यामुळे इथल्या मूळ समाजाने त्यांना आपल्यात सामावून

घेतले नसल्यामुळे या जमाती भटकत राहिल्या असाव्यात. अवचट यांच्या या विधानांना कोणताही आधार किंवा पुरावा नसल्याने त्यांना ग्राह्य मानता येणार नाही.

४. बाळकृष्ण रेणके :-

"१९५३ साली मागासवर्गीयांच्या अभ्यासासाठी नेमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाचा अहवाल १९५५ साली लोकसभेपुढे ठेवण्यात आला. या आयोगाने आपल्या अहवालात अनुसूचित जाती-जमाती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीयांची यादी घेऊन त्यांना सवलती देण्याची शिफारस केली होती. शिवाय या यादीतील काही जमाती अत्यंत मागासलेल्या असून त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले होते. या अत्यंत मागासलेल्या जमाती म्हणजेच भटक्या-विमुक्त जमाती होय."[४] बाळकृष्ण रेणके यांनी काकासाहेब कालेलकर अहवालानुसार भटक्या-विमुक्तांबद्दल आपले मत व्यक्त केलेले आहे. या आयोगानुसार अत्यंत मागासलेल्या जमातींना त्यांनी भटके-विमुक्त म्हटले तरी त्यांनी स्वत: केलेली अशी ही व्याख्या नाही. किंवा व्याख्या म्हणूनही ती तितकीशी संयुक्तिक वाटत नाही.

५. डॉ. लीनकुमार बावणे :-

"गावात राहणारा संपूर्ण समाज, गावाबाहेरील वेशीवर राहणारा दलित समाज, गावशिवार सोडून डोंगरात व दरी कपारीत वास्तव्य करणारा आदिवासी व वनवासी समाज आणि ज्याला आपले म्हणून सांगायला गाव नाही, शिवार नाही, स्वत:चे घर नाही, जो आकाशाचे छत पांघरून पोटासाठी वणवण सतत भटकणारा असा 'भटका' समाज."[५] बावणे यांनी गावात राहणारा तो समाज, गावाबाहेर राहणारा तो दलित समाज, डोंगरात व दऱ्यात राहणारा तो आदिवासी व वनवासी समाज अशी प्रत्येक समाजाचा वर्गवारी केलेली आहे. पण त्यापैकी ज्याला आपले स्वत:चे म्हणून सांगायला गाव नाही व जो उपजीविकेसाठी भटकतो, तो भटका समाज अशी

नेमकी पण सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. मात्र या व्याख्येत विमुक्त जातींचा समावेश होतो की नाही याचे स्पष्टीकरण केलेले नाही.

६. डॉ. ज्योतिप्रसाद जैन :-

"प्राचीनतम काळात जेव्हा मानवी संस्कृतीचा उदय होत होता, तेव्हा कमीत कमी भारतात ही मनुष्यजाती तीन प्रमुख संप्रदायांमध्ये विभागलेली होती आणि त्यांचे आचार-विचार आणि संस्कृती परस्परांहून भिन्न होती.

तिसरा समुदाय हा मानववंशाच्या लोकांचीच एक शाखा होय. कोणत्या एके फार पूर्वकाळी मध्यप्रदेशीय मूळ मानवजातीपासून फुटून निघून उत्तर पश्चिमेकडील पर्वतमय प्रदेशाकडे ही शाखा निघून गेली. हा समुदाय ज्ञान आणि विज्ञान या दोहोंमध्ये अविकसित राहिला. पशुपालन हे त्यांचे प्रमुख कार्य होते. हा समुह घुमक्कड भटक्याच राहिला."[६]

जैन यांच्या मते, मानवी संस्कृती ही प्रमुख तीन समुदायांमध्ये विभागलेली होती त्यापैकी तिसरा समुदाय हा मानववंशाचीच एक शाखा असून ज्ञान-विज्ञान यामध्ये जो भटक्याच राहिला तो भटका समाज असे म्हटले आहे. जैन यांची ही व्याख्या मानववंशशास्त्रदृष्ट्या अभ्यासपूर्ण अशी आहे. त्यांनी आदिम जीवन आणि भटके यांचा प्रवास या व्याख्येमध्ये दाखविलेला आहे. तसेच मानववंशाची व्युत्पत्तीही दाखविली असल्यामुळे ही व्याख्या प्रमाण मानण्यास हरकत नाही.

७. प्रा. मोतिराज राठोड :-

"मानव रानटी अवस्थेत असतानासुद्धा टोळी करुन राहत असल्याचा इतिहास आहे. उपजीविकेसाठी तो भटकत असल्याचे इतिहास सांगतो. आर्यसुद्धा भारतात भटकत भटकतच आले परंतु, आर्यांच्या टोळ्या जेव्हा भारतात स्थिरावू लागल्या तेव्हा आर्य आणि अनार्यांच्या अस्थिर टोळ्या यांच्यात संघर्ष होऊ लागला. या संघर्षात आर्यांचा पराभव होऊ लागला. या संघर्षात अनार्यांचा पराजय

झाला व ते पुन्हा पुन्हा भटकू लागले. जे अनार्य आर्यांना शरण आले नाही ते सतत भटकट राहून आपली उपजीविका करु लागले. तेच पुढे या नावाने ओळखले जाऊ लागले.''[७] राठोडांच्या मते, मानवाची भटकंती ही उपजीविकेसाठी झालेली आहे हे जरी खरे असले तरी पूर्वी आर्य आणि अनार्य अस्तित्वात असल्याचे त्यांचे मत मान्य करता येणार नाही. कारण डॉ. आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते? या त्यांच्या ग्रंथामध्ये आर्य किंवा अनार्य हे दोन नव्हतेच तर ते एकच होते असे म्हटले आहे त्यामुळे राठोडांचे आर्य आणि अनार्यांना भटके म्हणण्याचे मत नविन संशोधनांती ग्राह्य धरता येणार नाही.

८. राहुल सांकृत्यायन :-

''हमारे देश की तरह दुसरे देश में भी कुछ ऐसी जातीयाँ है जिनका न्ही एक जगह घर है और न गाव। यह कहना चाहिए की, वे लोग अपने गाव और घर को अपने कंधो पर उठाव चलते है। इन्ही जातीयों को घुमक्कड कहते है। जीविका के लिए कुछ करना चाहिए इसलिए वह चौबीसो घंटे घुम नही सकते। उन्हे बीच बीच में पाँच-दस दिन के लिए ठहरना पडता है।''[८] राहुल सांकृत्यायन यांनी या व्याख्येमध्ये भटक्यांसाठी 'घुमक्कड' असा शब्द वापरला आहे. त्यांच्या मते आपल्या देशाप्रमाणे दुसऱ्या देशातही अशा जातीचे काही लोक राहतात की ज्यांना स्वत:चे म्हणायला असे हक्काचे गाव किंवा घर नाही. जे लोक आपल्या घराचे ओझेच आपल्या खांद्यावर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जातात. उपजिवीकेसाठी त्यांना एका ठिकाणी जास्त काळ रहाता येत नाही. मध्ये मध्ये मुक्काम करत जे लोक राहातात ते भटके होय. तसेच सांकृत्यायन यांनी १९४६ साली भटक्या जमातीविषयी लिहून भटक्यांच्या गुलामीचा ऐतिहासिक पुरावा दिलेला आहे. त्यामुळे ही व्याख्या प्रमाण आणि प्रगल्भ अशी मानता येते.

१. K. N. Kadam:-

"These communities the VJ's and NT's in the ultimate anylysis are products of the social political, economic and even geographical history of the indian subconntinent & believe the arethe "broken" and unssmilated groups of peole in to they settled and intreated village communities of India''[१]

कदम यांनी या भटक्या जातींवर झालेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि भौगोलिक अत्याचाराची, ऐतिहासिक मांडणी केली आहे. त्यांच्यातूनच त्यांच्या वाट्याला 'ब्रोकनमेन' म्हणजे उध्वस्थ मानव होण्याची वेळ आली. त्याला भटके-विमुक्त म्हणून संबोधले आहे.

वरील सर्व व्याख्यांचा विचार करता त्या व्याख्यांतून सामान्यत: पुढील निष्कर्ष निघतात.

**निष्कर्ष :-**

१ . १८७१ सालच्या इंग्रजी कायद्यानुसार ज्यांना गुन्हेगार ठरविले गेले त्या जमातीलाच विमुक्त संबोधण्यात येऊ लागले.

२ . वतनदार, फिरस्ते, भटकंती करणारे याचा विमुक्तांचा अंतर्भाव केलेला आहे.

३. आदिम, मूळ रहिवासी यांना भटकत ठेवणाऱ्या अवस्थेतून बंदिस्त करणारी क्रिया म्हणजे विमुक्त. - अनिल अवचट

४. १९५३ च्या काकासाहेब कालेलकर अहवालात विशेष सवलती देण्याची शिफारस केलेले जाती-जमातीचे समूह म्हणजे भटके-विमुक्त होत.

५. ज्या समाजाला स्वत:चे गाव नाही, शिवार नाही, घर नाही अशा पोटासाठी वणवण फिरणाऱ्या जमाती म्हणजे भटके-विमुक्त होय.

६. डोंगराळ प्रदेशात अविकसित अवस्थेत पशुपालन करुन उपजीविका करणाऱ्या जमातींना घुमक्कड किंवा भटके-विमुक्त म्हटले जाते.

७. आर्य-अनार्य यांच्यात संघर्ष होऊन पराभूत झालेल्या जातींमधून उदयास आले असावेत. हा केलेला अंदाज वस्तुस्थितीला धरून नाही.

८. उपजीविकेसाठी गावोगाव भटकंती करणाऱ्या जमातीला घुमक्कड किंवा भटके-विमुक्त संबोधले जाते.

९. 'ब्रोकनमेन' अथवा उध्वस्थ मानव म्हणजेच भटके-विमुक्त होत.

सामान्यत: भटके किंवा-विमुक्त या जाती उदरनिर्वाहाकरता पशुपालन, भिक्षा, चोरी, कलाकौशल्य करत सतत भटकत राहतात. त्यामुळे त्यांना हक्काचे गाव, किंवा घर अस्तित्वात नसते. अशा समुहांना इंग्रजी कायद्याने गुन्हेगार ठरवून त्यांच्यावर जाचक निर्बंध घातले, ज्यामुळे ज्यांचे संपूर्ण जीवनमान उध्वस्थ झाले. अशा जाती-जमातीच्या समुहांना भटके-विमुक्त म्हणून संबोधता येईल.

महाराष्ट्रात नोंद झालेल्या एकूण ४६ जाती-जमाती भटक्या-विमुक्तात येतात. त्यापैकी १४ विमुक्त जाती म्हणून घोषित केलेल्या आहेत व ३० भटक्या जमाती म्हणून घोषित केलेल्या आहेत. त्यापैकी केवळ विमुक्त जातींचा अभ्यास करावयाचा असल्याने त्या विमुक्त जाती व त्यांच्या पोटजाती पुढीलप्रमाणे,

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा १९७६ मधील परिशिष्ट मधील भाग १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे

# विमुक्त जाती

| जाती | तत्सम |
|---|---|
| १. बेरड | अ) नाईकवाडी |
| | ब) तलवार |
| | क) वाल्मिकी |
| २. बेस्तर | अ) संचलु वड्डार |
| ३. भामटा | अ) भामटी |
| | ब) गिरणी |
| | क) कामाटी |
| | ड) पाथरुट |
| | इ) टकारी (मुस्लिम धर्मीयांसह) |
| | फ) उचले |
| ४. कैकाडी | अ) धोंतले |
| ( मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, | ब) कोरवा |
| नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर | क) माकडवाले किंवा |
| सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, | कोंचीकोरवा |
| औरंगाबाद, बाडे, परभणी, उस्मानाबाद, | ड) पायलोट |
| नांदेड व चंद्रपूर.) | इ) कोरवी |
| ५. कंजारभाट | अ) छारा |
| | ब) कंजार |
| | क) नाट |
| ६. कटाबू | – |

७. बंजारा

अ) गोर बंजारा

ब) लंबाडा/लंबाटा

क) लभाणी

ड) चारण बंजारा

इ) लमान

फ) मयुरा लभाण

ग) कचकीवाले बंजारा

क) लमाण बंजारा

इ) लमाण/बंजारा

ज) लमान

स) –

ल) धाली/धालीया

म) धाडी/धारी

न) सिंगारी

व) नावी बंजारा

प) जोगी बंजारा

क्यु)–

र) –

स) बंजारी

(शा. प. क्रं . सीबीसी १४४७/३५५/२– का–५ दि. १८ऑगस्ट १९७७ पासून भटक्या जमातीत)

८. वगळले

अ) पाल पारधी



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

९. राजपारधी अ) –

ब) गाव पारधी

क) हिरण शिकारी

ड) –

१०. राजपूत भामटा अ) परसुशी भामटा

ब) परदेशी भामटा

११. रामोशी

१२. वडार अ) गाडी वड्डार

ब) जाती वडार

क) जाती वडार

ड) पाथरवट

इ) संगतराश /दगडफोडू

१३. वाघरी अ) सलाट

ब) सलाट वाघटी

१४. छप्परबंद (मुस्लीम धर्मीयांसह)

वरील विमुक्त जातींपैकी 'पारधी' या जातीसमुहाचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास केल्यानंतरच त्यांच्या जीवनावर आधारीत 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या दोन कादंबऱ्यांचा परिपूर्ण विचार करता येईल. त्यामुळे प्रथम सामाजिक व सांस्कृतिक विचार करुया.

**पारधी जमात सामाजिक व सांस्कृतिक जीवन : –**

महाराष्ट्रामध्ये ज्या विमुक्त जमातींचा निर्देष केला जातो त्यांची संख्या २८ असून महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या या विमुक्त जमातींच्या यादीनधील

अनु.क्र.९ मध्ये पारधी या जातीचा समावेश केलेला आहे. पारधी ही जमात प्रामुख्याने शिकार करून उपजीविका करते, त्यामुळे पारधी या जमातीची व्युत्पत्ती 'पारध' म्हणजे शिकार करणे या शब्दापासून झाली असल्याचे मानले जाते. भटकंती करुन उपजीविका करणारी ही जमात असली तरी या जमातीची वस्तीस्थाने अलिकडच्या काळात महाराष्ट्रात प्रामुख्याने खानदेश, नासिक, सोलापूर, विजापूर, बीड इ. परिसरात पहावयास मिळतात. महाराष्ट्रामध्ये विविध भागामध्ये असणाऱ्या पारधी जमातींना फासेपारधी म्हणून संबोधण्यात येत असले तरी या पारध्यांमध्ये विविध प्रकारच्या पोटजाती आहेत. त्यामध्ये पारधी, फासेपारधी, गायपारधी, हरणपारधी, किंवा चिगरीबेटकर, मीर, कोरचार आणि त्यांच्या पोटजातीमध्ये हरणपारधी, मीर, कोसपर, वाघरी, मेवारी, टकारी, पालपारधी, राजपारधी, कोरचर, भिल्लपारधी, लंगोटीपारधी, बहिलीया, गायपारधी इ. पोटजातींची नोंद प्रभाकर मांडे यांनी 'गावगाड्याबाहेर'[१०] या ग्रंथात केलेली आहे. तर, भटके-विमुक्त जातीचे ज्येष्ठ अभ्यासक 'उपराकार' लक्ष्मण माने यांनी पुढीलप्रमाणे पोटप्रकार असल्याचे नोंदविलेले आहेत. त्या पोटप्रकारातील महत्त्वाचे प्रकार म्हणजे गायपारधी, चित्तापारधी, फासेपारधी, हरणपारधी किंवा हरणशिकारी, पालपारधी, टाकणकार, इ. असल्याचे मत 'विमुक्तायन'[११] मध्ये नमूद केलेले आहे. वरील दोन्ही मताचा विचार करता पारधी जमातीमध्ये एकूण १६ जाती-पोटजाती असल्याचे दिसून येते. या पोटजातींना जी नावे पडलेली आहेत, त्यासंदर्भात लक्ष्मण माने यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची आहे. ते म्हणतात की, ''गायीच्या मदतीने शिकार करतात, गायी पाळतात गायीवरून या गावावरुन त्या गावी जातात म्हणून त्यांना 'गायपारधी' म्हणतात, काहीजन चित्त्याच्या सहाय्याने शिकार करतात म्हणून ते 'चित्तेपारधी', हरणाची शिकार करणाऱ्यांना 'हरणपारधी' म्हटले जाते.'' अशा पोटजातीच्या उत्पत्तीच्या संदर्भात मांडलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. एवढेच नव्हे तर

अलिकडच्या काळात पारध्यांमध्ये धनगरपारधी व भिल्लपारधी असे पोटप्रकार अस्तित्वात असल्याची नोंद त्यांनी केलेली आहे. तसेच, लंगोटी नेसणारे लंगोटीपारधी हे विविध प्रकार प्रादेशिक भेदामुळे पडले असल्याची कबुली लक्ष्मण माने यांनी दिलेली आहे. सामान्यत: पारधी जमातीचे पोटभेद, व्यवसाय, राहणीमान आणि प्रादेशिकता यामुळे पडले असल्याचे दिसून येते.

१. शिकार हाच पारधी लोकांचा प्रमुख व्यवसाय असून पारधी पुरुष शिकार करून गावगाड्यातील लोकांना ती विकत असत आणि स्त्रिया भीक मागत असत. त्यामुळे शिकार व भिकार हाच त्यांचा व्यवसाय असल्याचे ते स्वत: सांगतात.

२. पारध्यांना शिकारीनंतर पर्यायी व्यवसाय मिळत नसल्याने ते गुन्हेगारीकडे वळले आणि पुढे ते 'बदनाम पारधी' म्हणून ओळखले जाऊ लागले. पारध्यांनी परंपरेनुसार स्वीकारलेली गुन्हेगारी वृत्ती सोडून चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न केला तरी गुन्हेगार जमात म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले.

३. पारधी लोक गुजराथी आणि राजस्थानी मिश्रीत भाषा बोलतात आणि ही भाषा महाराष्ट्रातील कंजारभाट, घिसाडी यांच्या भाषेशी साम्य दाखवते. पारधी लोक स्वकीयांमध्ये गुप्त भाषा बोलतात. गुप्त भाषेला ते 'फारसी' असे म्हणतात. आणि त्या गुप्त भाषेविषयी अधिक गुप्तता पाळताना दिसतात. या समाजाचे सामाजिक आणि धार्मिक जीवन परंपरागत पद्धतीचेच रुढ आहे.

४. पारधी जमातीत आईची पुजा महत्त्वाची मानली जाते. पुरुषदेवतांपेक्षा स्त्रीदेवतांना ते अधिक महत्त्व देतात. ज्या देवतांना ते पुजतात त्यांना काळुंका आई, भवानी माता या नावाने संबोधतात. परंतु, प्रदेशपरत्वे त्यांची नावे बदललेली दिसून येतात. देवाला नवस बोलल्याप्रमाणे वर्षातील काही ठराविक दिवशी म्हणजे शिमगा व दसऱ्याच्या वेळी या जमातीमध्ये जत्रा भरवली जाते.

देवाला रेडा बळी देणे आणि त्याचे रक्त प्रसाद म्हणून प्राशन करण्याचा प्रघात आहे. ही प्रथा पार पाडण्यासाठी कुठूनही पैसे उभे केले जातात.

५. पारधी जमातीत मूल जन्माच्या निमित्ताने पाचवी आणि बारसे घालण्याची पध्दती रूढ आहे. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवी करतात. त्यावेळी न्हाणीपुजन करुन बाळाचे थोडे केस काढून नामकरण विधी केला जातो. काही ठिकाणी आईनेच मुलाचे सर्व केस काढावाची पद्धत आहे. त्यावेळी काही ठिकाणी पाच सवाष्णींना म्हणजे पाच स्त्रियांना जेवू घालतात. तर काही ठिकाणी पाच लहान मुलांना जेवू घालण्याची पद्धत आहे. त्यानंतर घुगऱ्या वाटल्या जातात. नाव ठेवताना त्यांच्याच पितरांचे नाव ठेवले जाते. बारसे किंवा जावळ असा स्वतंत्र विधी येथे दिसून येत नाही.

६. या समाजात लग्नविधीही वेगळया पद्धतीने पार पाडला जातो. वधू-वरांना पिंपळाच्या पानाचे बाशिंग बांधले जाते. ही पाने उपलब्ध नसतात तेऱ्हा रुईच्या पानांचे बाशिंग बांधले जाते. लग्नाच्या आधी हळदीचे आणि इतर करमणुकीचे कार्यक्रमही होतात. काही ठिकाणी लग्नविधी हा ब्राह्मणाकडून घडवून आणला जातो. तर काही जमातीत हा विधी आपल्याच जमातीतील जाणकार व्यक्ती पार पाडतात. वराकडील मंडळींनी किंवा वरपित्याने वधुकडील मंडळींना देज म्हणजेच वधुमूल्य ठरल्याप्रमाणे द्यावे लागते. लग्नाच्या वेळी वधु-वरांच्या वस्त्रांना गणगोत मिळून सात गाठी बांधतात आणि अक्षता म्हणून सरकीच्या बिया हळदीत बुडवून फेकतात. जर त्या उपलब्ध नसतील तर कापसाची रिकामी बोंडे जी कलात्मकतेने गुंफलेली असतात ती उधळली जातात. एकाच आडनावातील व्यक्ती एकमेकांस भाऊबंद समजत असल्याने त्यांचे लग्न होत नाही.

७. भटक्या जमातीतील पोटजातींचा न्यायनिवाडा हा वेगवेगळ्या स्वरुपाचा असतो. पारधी जमातीमध्ये जात-पंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

ही जातपंचायत जत्रेच्यावेळी किंवा काही विशिष्ट कारणामुळे बोलावली जाते. त्यावेळी काही व्यक्तिगत आणि सामाजिक समस्याही मांडल्या जातात. हा न्यायनिवाडा ठराविक पंचासोर मांडला जातो. आणि पंचांचा निर्णय सर्वमान्य समजला जातो. गुन्ह्याचे स्वरूप पाहून त्यानुससार शिक्षा केल्या जातात. पूर्वी शिक्षा या क्रूर स्वरूपाच्या होत्या. उदा. उकळत्या तेलातून पैसा काढणे, पाण्यात उडी टाकून सोडलेला बाण पकडून परत आणणे, स्त्रियांचे केस कापणे, नाक कापणे, नखे उपटून काढणे, इ. परंतु यामध्ये आता बदल होऊन दंड केला जातो. जातपंचायतीचा निर्णय सर्वमान्य चर्चेतून आणि त्यातून शक्य झाले नाही तर शकून-अपशकूनाच्या आधारे निर्णय देण्याची पद्धत ग्राह्य धरली जाते.

८. पारधी जमात ही स्त्रीसत्ताक आहे. त्यामुळे स्त्रीला विशेष अधिकार दिले जातात. तसेच या समाजात स्त्रीला आदराचे व मानाचे स्थान दिले जाते. तसेच लग्नाच्यावेळी मुलीच्या आई-वडिलांना देज मिळतो. त्यामुळे मुलगी होणे लाभदायक मानले जाते. विवाह करुन घरात आलेली स्त्री तिच्या वाट्याला वैधव्य आले तर दीराबरोबर स्वेच्छेने जीवन जगण्यास अनुमती मिळते. या जमातीत स्त्रीच्या वाळत घातलेल्या साडीखालून त्या स्त्रीच्या नवऱ्याशिवाय अन्य पुरुष जाणे किंवा स्त्रीकडे वाईट नजरेने पाहणे हा गुन्हा ठरतो. तसेच या समाजात बहुपत्नीत्वाला मान्यता आहे. असे असले तरी या जमातीमध्ये स्त्रियांना पैशासाठी गहाण ठेवण्याची प्रथादेखील रुढ आहे.

९. पारधी जमातीमध्ये अंतिम संस्कार करण्याची प्रथा रुढ सामाजिक प्रथेप्रमाणेच आहे. मनुष्य वारल्यानंतर दफन करणे किंवा दहन केले जाते. दहाव्या किंवा तेराव्या दिवशी उत्तरक्रिया करणे, त्याचबरोबर घरातील पुरुष मंडळींचे मुंडण करणे हा प्रघात आहे.

**संदर्भः-**


१. भटक्या-विमुक्तांचे अंतरंग, रामनाथ चव्हाण, पृ.क्र.२१

२.गावगाडा, त्रि.ना.अत्रे, तृतीयावृत्ती, पृ.क्र.६

३.माणसं, अनिल अवचट, पाचवी आवृत्ती, पृ. क्र. १४२

४. भटक्या- विमुक्तांचा एलगार येत आहे, बाळकृष्ण रेणके, प्र. आ. पृ.क्र.१६

५. भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती, लिनकुमार बावणे

६. प्राचीन भारतातील नाग, एच.एल. कोसारे, ज्ञानप्रदिप नागपूर, पृ.क्र.२६

७. बंजारा संस्कृती, प्रा. मोतिराज राठोड, प्रिन्स औरंगाबाद, पृ.क्र.१०

८. घुमक्कड शास्त्र, राहुल सांकृत्यायन, राजकमल पब्लिकेशन दिल्ली, पृ.क्र.२०

९. Notes on vimukta jatis and the nomadic tribes of Maharashtrs, K.N.Kadam, page No.3

१०. मांडे प्रभाकर, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८३ पृ. क्र.१४९

११. विमूक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, प्रकाशन यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती १९९७ पृ. क्र.७६

१२. तत्रैव पृ.क्र.७६